# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१, अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)
८३, मित्तल चेंबर्स, आठवा मजला, २२८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी :+९१ - २२ - २२८२ ८२६२ / २२०२ ८२६१
ई-मेल : mahacim.mumbai@gmail.com संकेत स्थळ : www.mcimindia.org.in

| डॉ. दिलीप वांगे | डॉ. दत्तात्रय पाटील | डॉ. आशुतोष गुप्ता |
|---|---|---|
| प्रबंधक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |


दि. ८/४/२०२०

## परिपत्रक

महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, मुंबई या भारतीय चिकित्सा पद्धतीच्या वैद्यकीय व्यवसायींच्या नोंदणी व नियमनाचे कार्य करणाऱ्या परिषदेतील सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींना सुचित करण्यात येते की, सद्यस्थितीत देशात व राज्यात उद्भवलेल्या कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाद्वारे दि. २६/०३/२०२० रोजी प्रकाशित शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व परिषदांमधील वैद्यकीय व्यवसायींच्या सेवा अधिग्रहण करण्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट निर्णय घेतलेला आहे.

शासनाद्वारे प्राप्त निर्देशानुसार सध्या उद्भवलेल्या साथ रोगाच्या परिस्थितीमध्ये आवश्यकता भासल्यास आयुष डॉक्टरांचा देखील समावेश साथरोग प्रतिबंधक उपाय योजनांमध्ये करावा लागू शकतो. यादृष्टीने सर्व आयुष डॉक्टरांचे प्रशिक्षण होण्याकरिता परिषदेला कृती आराखडा तयार करुन त्यानुसार परिषदेतील सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासंबंधी निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार परिषदेने प्रशिक्षणाची योजना तयार केली असून, परिषदेच्या सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींना कळविण्यात येते की, सदरहू प्रशिक्षण सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींनी शनिवार, दि.११ एप्रिल २०२० पर्यंत खालील वेबसाईटवर दिलेल्या सुविधेच्या आधारे ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करुन घ्यावे.

प्रशिक्षणाकरिता खालील वेबसाईटवर गेल्यानंतर याठिकाणी केंद्र शासनाद्वारे दिलेल्या प्रशिक्षणाच्या व्हिडिओ लिंक्स यूट्यूबच्या आधारे बघून ऑनलाईन प्रशिक्षण घ्यावयाचे आहे. प्रशिक्षण सत्रांच्या सर्व लिंक्स बघितल्यानंतर, खालील वेबसाईटवर

८३, मित्तल चेंबर्स, आठवा मजला, २२८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी :+९१ - २२ - २२८२ ८२६२ / २२०२ ८२६१
ई-मेल : mahacim.mumbai@gmail.com संकेत स्थळ : www.mcimindia.org.in

| डॉ. दिलीप वांगे | डॉ. दत्तात्रय पाटील | डॉ. आशुतोष गुप्ता |
|---|---|---|
| प्रबंधक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |




यासंदर्भातील प्रश्नपत्रिका उपलब्ध राहणार असून या प्रश्नपत्रिकेतील बहुपर्यायी प्रश्न सोडवल्यानंतर अपेक्षित संख्येत योग्य उत्तरे दिलेल्या वैद्यकीय व्यवसायींना सदर प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र त्याच वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने प्राप्त होणार असून, ते त्या ठिकाणी डाऊनलोड करण्याची व प्रिंट करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

परिषदेच्या नीति-नियमांत नमूद तरतुदींनुसार साथरोगाच्या वेळी शासनाच्या आवश्यकतेनुसार सेवा देणे बंधनकारक असून यासंदर्भात सर्व वैद्यकीय व्यवसायींना शासनाद्वारे प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाद्वारे प्राप्त निर्देशांचे पालन न केल्यास संबंधित वैद्यकीय व्यवसायी नीति-नियम भंगाच्या कार्यवाहीस पात्र होऊन कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. शासनाद्वारे प्राप्त निर्देशांनुसार सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींना अत्यावश्यक बाब म्हणून निर्धारित कालमर्यादेत सदर प्रशिक्षण पूर्ण करुन यासंदर्भातील प्रमाणपत्र मिळविणे अनिवार्य आहे, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

प्रशिक्षणाकरिता वेबसाईट - www.mcimtraining.com

सदर प्रशिक्षण घेण्याकरिता खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

१) या वेबसाईटवर ट्रेनिंग (training) या सदराखाली दिलेले सर्व सत्रांचे व्हिडिओ पाहून प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा.

२) याशिवाय अधिक माहितीकरिता या वेबसाईटवर उपलब्ध असलेले स्टडी मटेरियल आणि एफ. ए. क्यू. चा आपण संदर्भाकरिता उपयोग करु शकतो.

३) EXAM या सदराखाली आपला मोबाईल नंबर भरुन त्या मोबाईलवर आलेल्या ओ. टी. पी. च्या आधारे लॉगिन केल्यानंतर पुढील माहिती भरण्याकरता उपलब्ध होईल.

४) EXAM या सदराखाली सर्वप्रथम आपली आवश्यक ती संपुर्ण माहिती बिनचूकपणे भरावी. माहिती भरतांना खालील सूचनांचे पालन करावे. चुकीची माहिती भरल्यास संबंधित

वैद्यकीय व्यवसायी स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. खोडसाळपणे अन्य खोट्या नांवाने, किंवा नोंदणी क्रमांकाचा वापर करुन चुकीची माहिती भरल्यास ज्या मोबाईल नंबरवर ओ.टी.पी. आला आहे तो व्यक्ती कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

५) नांवाच्या सदरामध्ये आपले संपूर्ण नांव लिहावे, नांवापूर्वी Dr. लिहिण्याची आवश्यकता नाही.

६) रजिस्ट्रेशन नंबर भरत असताना केवळ आकडेच (only digits) भरावे. (उदा. १२३४५) नोंदणी क्रमांकाच्या आधी लिहिलेले आय (I) किंवा नोंदणी क्रमांकाच्या शेवटी दिलेले शेड्युल लिहिण्याची आवश्यकता नाही (उदा. A, A१, B, C, D, E)

७) मागितलेली माहिती दिलेल्या जागेमध्ये भरावी

८) परिषदेच्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींनी (डॉक्टर्स) व आंतरवासिता प्रशिक्षणार्थींनी (इंटर्न) योग्य तो पर्याय निवडून माहिती पूर्णपणे भरावी.

९) प्रश्नपत्रिकेत विचारलेल्या बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे द्यावयाची आहेत. ५०% पेक्षा अधिक गुण मिळाल्यानंतर ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने प्राप्त होईल. सदर प्रमाणपत्र डाउनलोड किंवा प्रिंट करुन घ्यावे. ज्या व्यक्तींना प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याकरिता काही तांत्रिक अडचणी उद्भवतील त्यांना प्रमाणपत्राचा स्क्रीनशॉट देखील घेता येईल.

१०) ज्यांना ५०% पेक्षा कमी गुण मिळाले आहेत त्यांना पुन्हा व्हिडिओ व स्टडी मटेरियलचा अभ्यास करुन परीक्षा देता येईल.

(डॉ. दिलीप उत्तमराव वांगे)

प्रबंधक

महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, मुंबई.